महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ९८९ /२०२४ दि. 22/०८/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. २७/०८/२०२४ रोजी **'गोपाळकाला'** सणामिमित्त डोंबिवली पश्चिम परिसरातील दिपेश म्हात्रे फाउंडेशन तर्फे पंडित दिनदयाळ रोड वरील गणपती मंदिर रोड ते सम्राट चौक येथील व्यंकटेश दर्शन बिल्डींग परिसरात २४ X २४ फुट लांबी रूंद कमानी उभारण्यात येणार आहेत. तसेच सदर कार्यक्रमात मोठया संख्येने गोविंदा पथक सहभागी होणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद –** १) डोंबिवली रेल्वे स्टेशन कडून पंडित दिनदयाळ रोडने सम्राट चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **गणपती मंदिर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने गणपती मंदिराजवळ डावे वळण घेवून जी. एन. गॅरेज, येलोरा सोसायटी कडून सम्राट चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) पंडित दिनदयाळ रोडने ठाकूरवाडी तसेच रेतीबंदर चौक कडून सम्राट चौक मार्गे डोंबिवली पश्चिम रेल्वे स्टेशन कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **सम्राट चौक, व्यंकटेश सोसायटी** येथे **प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने सम्राट चौक कडून डावे वळण घेवून नाना शंकर शेठ रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसुचना दि. २७/०८/२०२४ रोजी ००:०१ ते रात्रौ २४.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत माहितीस्तव सविनय सादर –**
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण.

CamScanner

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर,**
मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
२/– आपणास विनंती करण्यात येते की, आपण मोटार वाहन कायद्याचे कलम १६१ (१) (अ) (ब) अन्वये संबंधीत ठिकाणी वाहन पार्किंग फलक लावणेबाबत आपले अधिनस्थ संबंधीतांना आदेश निर्गमित करावेत.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.

CamScanner